**वार्षिक विज्ञान निबंध स्पर्धा २०२५**

कोणत्याही विषयावर निबंध लिहिण्यापूर्वी त्याविषयाचा अभ्यास करावा लागतो. त्याविषयाला अनुसरून उपलब्ध माहिती वाचावी लागाते. विषयाची मांडणी आकर्षक व परिणामकारक करणे हा निबंध लिखाणाचा महत्त्वाचा भाग आहे. मराठी विज्ञान परिषद १९६७ सालापासून निबंध स्पर्धेचे आयोजन करत आहे. १९८७ पासून ही स्पर्धा दोन गटात घेतली जाते. यावर्षीच्या दोन गटाचे विषय पुढीलप्रमाणे आहेत.

**विद्यार्थी गट (इयत्ता बारावीपर्यंत)**

**मोबाइलपासून मैदानाकडे :** आज मोबाइलचा वापर सर्वत्र होत आहे. किंबहुना कोरोना साथीपासून शालेय विद्यार्थ्यांकडे मोबाइल असण्याचे प्रमाणही खूप वाढले आहे. मोबाइलचे रोजच्या जीवनात नानाविध उपयोग आहेत, ह्याबाबत कोणाचेच दुमत नसेल. पण मोबाइलचा अतिवापर व्हायला लागला आहे, याविषयी पण सगळे सहमत असाल याबाबत शंका नाही. ‘अति तिथे माती’ या उक्तीप्रमाणे अति मोबाइल वापराचे दुष्परिणाम जाणवू लागले आहेत. त्यात डोळ्यांचे विकार, पाठीचे / मानेचे दुखणे, निद्रानाशाची समस्या इत्यादी अनेक त्रास होत आहेत. तसेच मोबाइलबरोबर घालवत असलेल्या अति वेळामुळे शारीरिक व्यायामाकडे दुर्लक्ष होत आहे, मोबाइलवरील खेळात गुंग राहात मैदानी खेळाकडे कोणी फिरकतच नाही असे चित्र सर्वत्र बघायला मिळते आहे. यामुळे लठ्ठपणा व तत्सम शारीरिक दोष वाढीला लागलेले दिसत आहेत. या पार्श्वभूमीवर जागरूकता करून मोबाइलचा वापर सीमित करत व्यायाम करणे, मैदानी खेळ खेळणे याचा समतोल साधत पुढे जायला हवे. त्या अनुषंगाने विचार या निबंधात मांडणे अपेक्षित आहे. सद्यस्थितीत याचे दोष, त्याचे होत असलेले दुष्परिणाम आणि अपेक्षित सुधारणा वा उपाय याविषयीची चर्चा निबंधात अपेक्षित आहे.

**वार्षिक निबंध स्पर्धा २०२५ खुला गट (पदवीचे विद्यार्थी व इतर सर्व प्रोढ)**

**देहदान आणि अवयवदान :** भारतात दरवर्षी लाखो लोकांना अवयव प्रत्यारोपणाची गरज असते, पण दान करणाऱ्यांचे प्रमाण कमी आहे. राष्ट्रीय अवयव व ऊतक प्रत्यारोपण संस्था (NOTTO) सरकारमार्फत जनजागृती आणि व्यवस्थापनाचे कार्य करते. भारताचा अवयव दान दर (ऑर्गन डोनेशन रेट) अद्यापही विकसित देशांपेक्षा खूपच कमी आहे. आपल्या देशात १० लाख लोकांमागे सुमारे ०.५ ते १ अवयव दाते आहेत तर स्पेनसारख्या देशांमध्ये हा दर ४०च्या आसपास आहे. यामागे अंधश्रद्धा, माहितीचा, जनजागृतीचा आणि लोकशिक्षणाचा अभाव ही प्रमुख कारणे आहेत. अवयव दान केव्हा करता

येते, याबद्दल बहुतेक लोक अनभिज्ञ असतात. ब्रेन डेथ म्हणजे नक्की काय? निबंधामध्ये ही गोष्ट नीट समजावून सांगणे अपेक्षित आहे. अवयवदानाच्या माध्यमातून एक व्यक्ती असाध्य रोगांच्या आठ रुग्णांना जीवनदान देऊ शकते हे आवर्जून सांगणे गरजेचे आहे. ‘मरावे परि अवयवरूपी उरावे’ अशी भावनिक हाक घालून लोकांना अवयवदानाची नोंदणी करायला कसे प्रवृत्त करता येईल याविषयी काही कल्पक उपाययोजनेचा अंतर्भाव निबंधात आल्यास उत्तम. देहदान / अवयवदान नोंदणी करणे वा इच्छापत्र करणे या सोयीबद्दल माहिती निबंधात यावी.

(सूचना : छायाचित्रे, कात्रणे इत्यादींचा अंतर्भाव निबंधात करू नये.)

तिन्ही स्पर्धांच्या अधिक माहितीसाठी संपर्क : मराठी विज्ञान परिषद, विज्ञान भवन, वि.ना. पुरव मार्ग, शीव-चुनाभट्टी, मुंबई ४०००२२. दूरध्वनी : (०२२) - ४८२६३७५० / ४८२६००९४ भ्रमणध्वनी : ९९६९१००९६१ इ-मेल : officer1.admin@mavipa.org

**स्पर्धेचे नियम :**

१. महाराष्ट्राचे खालीलप्रमाणे पाच भौगोलिक विभाग आणि बृहन्महाराष्ट्राचा सहावा विभाग केला असून, विद्यार्थ्यांनी आणि खुल्या गटातील स्पर्धकांनी आपले निबंध खालीलप्रमाणे पाठवावेत. दिलेल्या पत्त्यावर निबंध पाठविण्याची अंतिम तारीख ३१ ऑगस्ट, २०२५ ही आहे.

२. **विभाग १ : मुंबई शहर व कोकण विभाग**

मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, सिंधुदुर्ग, रत्नागिरी या जिल्ह्यांतील स्पर्धकांनी आपले निबंध, **प्रा. डॉ. उमेश संकपाळ, कार्यवाह, मराठी विज्ञान परिषद, रत्नागिरी विभाग, द्वारा रसायनशास्त्र विभाग, गोगटे-जोगळेकर महाविद्यालय, रत्नागिरी ४१५६१२** यांच्याकडे पाठवावेत.

**विभाग २ : दक्षिण महाराष्ट्र विभाग**

सातारा, कोल्हापूर, सांगली, पुणे, सोलापूर, अहिल्यानगर या जिल्ह्यांतील स्पर्धकांनी आपले निबंध, **डॉ. अंजली साळवी, अध्यक्ष, मराठी विज्ञान परिषद, कोल्हापूर विभाग, डी-१, अमेय प्लाझा, ओपल हॉटेलमागे, कोल्हापूर, ४१६००५** यांच्याकडे पाठवावेत.

**विभाग ३ : उत्तर महाराष्ट्र विभाग**

जळगाव, धुळे, नाशिक, नंदुरबार या जिल्ह्यांतील स्पर्धकांनी आपले निबंध **डॉ. राजेंद्र अहिरे, कार्यवाह, मराठी विज्ञान परिषद, साक्री विभाग, १२, प्रतीक, अकलाडे नगर, साक्री, जि. धुळे ४२४३०४** यांच्याकडे पाठवावेत.

**विभाग ४ : मराठवाडा विभाग**

छत्रपती संभाजीनगर, बीड, धाराशिव, नांदेड, लातूर, परभणी, जालना, हिंगोली या जिल्ह्यांतील स्पर्धकांनी आपले निबंध **श्री. सुधीर देशमुख, कार्यवाह, मराठी विज्ञान परिषद, माजलगाव विभाग, रेणुका निवास, गजानन नगर, गजानन मंदिरामागे, माजलगाव, जि. बीड ४३११३१** यांच्याकडे पाठवावेत.

**विभाग ५ : विदर्भ विभाग**

चंद्रपूर, यवतमाळ, अमरावती, अकोला, भंडारा, नागपूर, वर्धा, बुलढाणा, गडचिरोली, वाशिम, गोंदिया या जिल्ह्यांतील स्पर्धकांनी आपले निबंध **प्रा. महादेव खाडे, अध्यक्ष, मराठी विज्ञान परिषद, वणी विभाग, प्रगती नगर, वणी, जि. यवतमाळ ४४५३०४** यांच्याकडे पाठवावेत.

**विभाग ६ : बृहन्महाराष्ट्र**

महाराष्ट्राबाहेरील वडोदरा, गोवा, पेडणे आणि निप्पाणी इत्यादी ठिकाणच्या स्पर्धकांनी आपले निबंध **श्रीमती अंजली देसाई, कार्यवाह, मराठी विज्ञान परिषद, गोवा विभाग, गोमंत विद्या निकेतन, आबाद फरीया रोड, मडगाव, गोवा ४०३६०१** यांच्याकडे पाठवावेत.

३. प्रत्येक भौगोलिक विभागातील शालेय गटासाठी पहिल्या व दुसऱ्या क्रमांकांच्या निबंधांना अनुक्रमे **रु. ८००/- व रु. ४००/-** तर खुल्या गटासाठी अनुक्रमे **रु. १,००० व रु. ५००/-** ची पारितोषिके दिली जातील. विभागाने निर्णय मध्यवर्तीस स्वतंत्रपणे कळविल्यावर पारितोषिकांची रक्कम थेट विजेत्यांना मध्यवर्तीकडून पाठविली जातील. विद्यार्थी गटाची पारितोषिके **रमाकांत टिपणीस स्मृतिप्रीत्यर्थ** दिली जातात.

४. प्रत्येक भौगोलिक विभागातील दोन्ही गटांतील पहिले दोन निबंध अंतिम परीक्षणासाठी **डॉ. रंजन गर्गे, अध्यक्ष, मराठी विज्ञान परिषद, औरंगाबाद विभाग, विहंग, एन-३/४०६, सिडको, छत्रपती संभाजीनगर ४३१००३** येथे **३० सप्टेंबर, २०२५ पर्यंत** पाठवावेत. निरनिराळ्या भौगोलिक विभागांकडून आलेल्या निबंधांचे परीक्षण राज्यस्तरावर पुन्हा स्वतंत्रपणे होईल. त्यांतील पहिल्या दोन क्रमांकांना खुल्या गटासाठी अनुक्रमे **रु. २,५००/- आणि रु. २,०००/-**, विद्यार्थी गटासाठी अनुक्रमे **रु. २,०००/- आणि रु. १,५००/-** अशी पारितोषिके दिली जातील.

५.	स्पर्धेत त्या-त्या ठिकाणी उल्लेख केलेल्या गटांच्या पातळीप्रमाणे कोणासही भाग घेता येईल. स्पर्धेसाठी प्रवेश शुल्क नाही. निबंध कागदाच्या एका बाजूस सुवाच्य अक्षरात लिहावा. मात्र, ज्या व्यक्तीस निबंध स्पर्धेत दोनदा पारितोषिके मिळाली आहेत, त्याने परत भाग घेऊ नये.

६.	शब्दसंख्या १५०० ते २००० असावी. लिखाण कागदाच्या एकाच बाजूला असावे. स्वहस्ताक्षरात असल्यास उत्तम. कागद ए-४ आकाराचा असावा.

७.	साहित्याबरोबर लेखकाने आपले संपूर्ण नाव आणि पिनकोडसह पत्ता लिहावा. तसेच, संपर्कसाठी भ्रमणध्वनी क्र. द्यावा. शिवाय, इ-मेल संपर्क असल्यास, तो पत्ताही द्यावा. शीर्षकासह ही सर्व माहिती पहिल्या पानावर लिहावी.

८.	पारितोषिक न मिळालेले निबंध परत पाठविले जाणार नाहीत. (निबंधामध्ये चित्रे चिकटवू नयेत)

९.	स्पर्धेसंबंधीचा अंतिम निर्णय मराठी विज्ञान परिषद, छत्रपती संभाजीनगर विभागाचा राहील.

१०.	सर्व पारितोषिके आणि प्रमाणपत्रे पोस्टाने पाठवण्यात येतील.

११.	स्पर्धेसाठी विस्तृत माहिती मराठी विज्ञान परिषद मध्यवर्ती कार्यालय, विज्ञान भवन, वि.ना. पुरव मार्ग, शीव-चुनाभट्टी, मुंबई ४०००२२. येथे मिळेल. दूरध्वनी : (०२२) - ४८२६३७५० / ४८२६००९४, भ्रमणध्वनी : ९९६९१००९६१ (साप्ताहिक सुट्टी मंगळवार)

इ-मेल : officer1.admin@mavipa.org संकेतस्थळ: www.mavipa.org